International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 18 May-June 2024

# इतिहास आणि नवीन शैक्षणिक धोरण

**डॉ. अमोल लक्ष्मणराव ढोबळे**
इतिहास विभाग प्रमुख, धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर
**Corresponding Author - डॉ. अमोल लक्ष्मणराव ढोबळे**
**DOI- 10.5281/zenodo.11654852**

**गोषवारा: -**

शिक्षण पद्धतीच्या मार्गाने आज आपण तीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून प्रवास करीत २०२० च्या धोरणाच्या अंमलबजावणीच्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचलो आहोत. जे राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ मध्ये आले, ते कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते. त्यात वयाच्या १४ वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि पात्रता तसेच तीन भाषांचे सूत्र, सर्वांना शिक्षणाची समान संधी, १०+२+३ अशी संरचना होती. १९८६ चे धोरण राजीव गांधींनी लागू केले. महिला, अनुसूचित जाती ,जमातींसह सर्वांना समान शिक्षणाची संधी प्रदान करणे, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे, देशभरात १०+२+३ पॅटर्न च तत्काळ अमलबजावणी करणे, शाळांमधून अन्न आणि आरोग्यदायी वातावरणाची योग्य उपलब्धता करून देणे, मुक्त विद्यापीठ आणि दुरुस्त शिक्षण संस्था उघडणे, राष्ट्रीय महत्त्व असलेल्या संस्थांना सक्षम बनवण्यावर भर होता. १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात पी. व्ही. नरसिंहराव सरकारने १९९२ मध्ये बदल केले. नवोदय विद्यालयांमध्ये गुणवत्ता वाढीवर भर दिला. प्रत्येक राज्यात किमान एक मुक्त विद्यापीठ उघडण्याची तरतूद करण्यात आली. व्यवसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षांच्या आधार घेतला गेला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शाळाबाह्य मुलांना मुक्त शाळा प्रणाली द्वारे मुख्य प्रवाहात आणणे, पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रावर भर देणे, सध्याची शिक्षण प्रणाली बदलून ३-८, ८-११, ११-१४ आणि १४-१८ वर्ष वयोगटातील नवीन ५+३+३+४ अभ्यासक्रम आणणे, व्यावसायिक शिक्षणावर भर देणे, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र PARKH ची निर्मिती करणे, सर्व अभ्यासक्रम आंतर विद्या शाकीय करणे, असे काही महत्त्वाचे बदल घडून येणार आहेत. २०२२ पासून यांची अंमलबजावणी होणार असल्याने येणाऱ्या काळात या धोरणाचे फायदे-तोटे आपल्या लक्षात येतील.

**बीजशब्द: -** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, NEP, व्यवसायिक शिक्षण, एन.सी.ई.आर.टी, मोफत आणि सक्तीचे शिक्षण

**प्रस्तावना: -**

प्राचीन काळी शैक्षणिक धोरण कसे होते याविषयी काही फारशी माहिती उपलब्ध नाही. पण आर्यांनी मात्र शैक्षणिक धोरणामध्ये स्पष्टता आणली आणि स्थानिक लोकांना या धोरणाचे पालन करणे बंधनकारक केले. वैदिक काळामध्ये विद्या प्राप्त करण्याला महत्त्व होते. विद्या प्राप्त केलेल्या माणसाला मान व आदर मिळत असे. (ऋषी, महर्षी, ब्रह्मर्षी) त्यानंतर मौर्यसारखी राजघराणी समाजाचे राहणीमान उंचावण्यासाठी उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देऊ लागले. म्हणूनच नालंदा, तक्षशिला यांसारखी विद्यापीठे तयार झाली. पुढे वैदिक शिक्षणावर आधारित नसलेली, सर्वसामान्यांसाठीची बौद्ध विचारसरणीची शिक्षण पद्धती आणि सामाजिक स्तर जपणाऱ्या ब्राह्मणी विचारसरणीची शिक्षण पद्धती यामध्ये चढाओढ सुरू राहिली. त्यानंतर आले मुघल साम्राज्य. या साम्राज्याने शिक्षण पद्धतीत बदल करण्याची फारशी तसदी घेतली नाही. हिंदू हिंदूंच्या पद्धतीने व मुस्लीम

मदरशामध्ये शिक्षण घेऊ लागले. दोन्ही धर्माचे लोक एकमेकांची भाषा शिकून उर्दू भाषेचा जन्म मात्र याच काळात झाला.

ब्रिटिश आपल्या इथे आल्यानंतर मात्र शिक्षण पद्धतीमध्ये बदल होऊ लागले. सर्वप्रथम मिशनरी लोकांनी ख्रिश्चन धर्म पसरवण्याच्या दृष्टीने शिक्षणाचा प्रसार सुरू केला. त्यानिमित्ताने ब्रिटीश सरकारला भारतात आधुनिक शिक्षणाचा फारच अभाव असल्याचे जाणवले. १७८१ ला गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया, हेस्टिंगने कलकत्ता येथे मदरसा व बनारस येथे बनारस संस्कृत महाविद्यालय स्थापन केले. पण असा अपवाद वगळता मिशनरी शिक्षण हे इंग्रजी वाचन, लेखन, अंकगणित व ख्रिश्चन धर्माची शिकवण पसरवणे इतकेच मर्यादित होते. मातृभाषेतून किंवा संस्कृत भाषेतून शिक्षण मिशनरींना मान्य नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीला राज्यकारभाराच्या दृष्टीने त्याची गरज भासत होती. १८१३ चा चार्टर अॅक्ट येईपर्यंत मिशनरी आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यामधील मतभेद चालू होते. या अॅक्टमुळे प्रथमच भारतातील शिक्षणव्यवस्थेसाठी एक लाख रुपयांचा निधी ब्रिटिश सरकारने दिला. तरी शिक्षण इंग्रजीमध्ये असावे की संस्कृतमध्ये याविषयी स्पष्टता नसल्याने वाद चालूच राहिले. तो काळ परिवर्तनाचा होता. राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या समाजसुधारकांना, भारतातील लोकांना जगात काय चालले आहे हे कळावे या दृष्टीने शिक्षण इंग्रजीमधून असावे असे वाटले.

पूर्वी आपल्याकडे शिक्षणाची गुरुकुल पद्धत होती. पुढे १८३५ च्या मेकॉलेच्या कारकून बनवणाऱ्या शिक्षण पद्धतीने आपली मानसिकता बदलत गेली. इंग्रजांनी निर्माण केलेली शिक्षण पद्धती आजही काही प्रमाणात सुरू आहे. सध्या ज्याची चर्चा सुरू आहे ते राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजेच "नॅशनल पॉलिसी ऑन एज्युकेशन" अर्थात NPE. शिक्षणाचा प्रचार आणि नियमन करण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तयार केले आहे. या ग्रामीण आणि शहरी भागातील प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षणाच्या समावेश आहे. नव्या शैक्षणिक धोरणाने विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्याच्या विकास होईल. विद्यार्थी नोकरी मागणार नाही, तर ते नोकरी देणारे होईल. असे आपले नवीन शैक्षणिक धोरण. ह्या शिक्षणातील क्रांतीचा आराखडा म्हणजेच NPE हे धोरण ठरविण्यामागे भारत जगाचा नेता व्हावा असा दृष्टिकोन आपण नवीन शैक्षणिक धोरणाच्या मार्फत ठरविलेला आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण पद्धती:**

स्वतंत्र भारताला वेगळ्या प्रकारच्या शिक्षण पद्धतीची गरज होती. स्वातंत्र्यलढ्यात शैक्षणिक क्षेत्रातील लोकांना दिलेल्या आश्वासनांची वचनपूर्ती करणे आवश्यक होते. त्यासाठी संपूर्ण शिक्षण पद्धतीची पुनर्बांधणी करणे आवश्यक होते. सर्वांना वयाच्या १४ व्या वर्षांपर्यंत सक्तीचे आणि नि:शुल्क शिक्षण घ्यावे या वादाला राज्यघटनेमुळे आधार मिळाला. भारतीय शिक्षणव्यवस्थेचा नवीन अध्याय सुरू होणार होता. भारतातील वैविध्यामुळे नवनवीन समस्या व आव्हाने समोर उभी राहात होती. १९५० साली स्वीकारलेल्या घटनेनुसार शिक्षण ही राज्य व केंद्र या दोन्ही सरकारांची जबाबदारी ठरली. केवळ समान संधीची नाही तर सर्वांना समान सामाजिक न्याय मिळावा या दृष्टीने पावले उचलली गेली.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शहरी आणि ग्रामीण भागातील निरक्षरतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारत सरकारने विविध कार्यक्रम आखले. भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांनी एकसमान शैक्षणिक प्रणालीसह संपूर्ण देशभरातील शिक्षणावर केंद्र सरकारच्या मजबूत नियंत्रणाची योजना मांडली. शिक्षण प्रणाली विकसित करण्यासाठी विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-१९४९), माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-१९५३) विद्यापीठ अनुदान आयोग आणि कोठारी आयोग (१९६४-१९६६) ची स्थापना करण्यात आली. पंडित नेहरू यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सारख्या उच्च दर्जाच्या वैज्ञानिक शिक्षण संस्थाच्या विकास केला. केंद्र सरकारने १९६१ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेची NCERT स्थापन केली. संस्थान केंद्र आणि राज्य सरकारांना शैक्षणिक धोरणे तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी सल्ला देते.

पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९६८ मध्ये, दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८६ मध्ये आणि तिसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२०

मध्ये जाहीर केले. तीनही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा थोडक्यात संशोधनात्मक आणि तुलनात्मक आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८: -**

चे राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ मध्ये आले ते कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते .या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रकारे आपल्याला मांडता येतील -

**मोफत आणि सक्तीचे शिक्षण: -**

भारतीय संविधानाच्या कलम ४५ नुसार वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण असले पाहिजे. शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलाने अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला पाहिजे.याची खात्री करण्यासाठी पावले उचलली पाहिजे .असे या धोरणात प्रामुख्याने नमूद केले होते.

**शिक्षकांचे शिक्षण आणि प्रशिक्षण: -**

शिक्षकांचे उत्तम प्रशिक्षण झाले पाहिजे प्रत्येक स्तरावर योग्य ती पात्रता शिक्षकांनी धारण केलेले असावी ही अपेक्षा यामध्ये व्यक्त केली गेली.

**भाषा विकास: -**

या धोरणात देशात भारतीय तसेच परदेशी भाषांच्या विकासावर भर देण्यात आला. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्याला हिंदी, इंग्रजी आणि त्याच्या राज्याची प्रादेशिक भाषा अवगत असावी .असे तीन भाषांचे सूत्र आखण्यात आले होते. माध्यमिक स्तरावर ऐच्छिक विषय म्हणून संस्कृत भाषेचा यामध्ये समावेश करण्यात आला .

**सर्वांना शिक्षणाची संधी: -**

या धोरण अंतर्गत देशातील प्रत्येक मुलाला जात धर्म प्रदेश वेगवेगळे असले तरी शिक्षण मिळाले पाहिजे. मागासवर्गीय अल्पसंख्याक मुले , मुली आणि शारीरिक दृष्ट्या विकलांग मुलांना शिक्षणाच्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी विशेष भर देण्यात यावा .अशी यामध्ये तरतूद करण्यात आली.

**समान शैक्षणिक संरचना: -**

संपूर्ण देशात शिक्षणाची रचना एक समान असावी यावर भर देण्यात आला. उच्च माध्यमिक ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत १०+२+३ अशी आखणी करण्यात आली.

**प्रगतीचा आढावा: -**

सरकारने वेळोवेळी देशातील शिक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेऊन भविष्यातील विकासासाठी मार्गदर्शक तत्वे मांडली पाहिजे असे या धोरणात नमूद केले गेले.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ मधील अडचणी**

१९६८ चे राष्ट्रीय शिक्षण धोरण फारसे यशस्वी झाले नाही असा आरोप होता याची अनेक कारणे होती. एक तर त्यावेळी कृतीचा योग्य कार्यक्रम आणला गेला नाही .दुसरे म्हणजे निधीची कमतरता यामागे होती. त्या सुमारास भारताची अर्थव्यवस्था दम खायला आली होती आणि तिसरे म्हणजे त्यावेळी शिक्षण राज्याच्या यादीत होते. त्यामुळे राज्य ही योजना कशी राबवतील यावर केंद्राची भूमिका फारशी प्रभावी नव्हती किंवा त्यावर केंद्राचे फारसे नियंत्रण नव्हते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ काही प्रमाणात यशस्वी झाले १०+२+३ शिक्षण पद्धतीचा समावेश झाला. तीन भाषाचे सूत्र लागू झाले. त्यांचे पालन आजही बहुतेक राज्यांमध्ये केले जाते. गणित आणि विज्ञान या विषयाला प्राधान्य मिळाले.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६**

इंदिरा गांधींच्या निधनानंतर राजीव गांधी युवा अवस्थेत पंतप्रधान झाले १९८६ चे राष्ट्रीय धोरण राजीव गांधींनी लागू केले. पुढे पी. व्ही. नरसिंगराव पंतप्रधान असताना १९९२ मध्ये ते अद्यावत करण्यात आले. असं म्हणतात शिक्षणाच्या अडचणी दूर करण्यावर आणि शिक्षणाच्या संधी समान करण्यावर विशेष भर देण्यात येऊन त्याची नावे ही यामध्ये देण्यात आली. या धोरणाचा मुख्य उद्देश म्हणजे महिला अनुसूचित जाती जमातीसह सर्वांना समान शिक्षणाची संधी प्रधान करणे . शिक्षणाचे विकेंद्रीकरण आणि जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे हा एक उद्देश या धोरणामध्ये होता. देशभरात शिक्षणाच्या १०+२+३ पॅटर्न ची तात्काळ अंमलबजावणी करण्याची शिफारस करण्यात आली. प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शैक्षणिक कार्यक्रमाची तसेच शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची शिफारस यामध्ये करण्यात आली होती. शाळांमधून अन्न आणि आरोग्यदायी वातावरणाची योग्य उपलब्धता करण्याची ही शिफारस यामध्ये करण्यात

आली होती. यापूर्वीच्या धोरणाप्रमाणेच प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात आले. भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक, विज्ञान, सांख्यिकी ,इतिहास हे विषय आणि नागरिकांची राष्ट्रीय आणि घटनात्मक जबाबदारी यासारख्या संकल्पना शिकविण्यासाठी प्राधान्य दिल्या गेले.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मुक्त विद्यापीठ आणि दुरुस्त शिक्षण संस्था उघडून उच्च शिक्षणाचा विस्तार केला जाईल आणि अशा शिक्षणाच्या पद्धतीला यूजीसी कडून समान दर्जा आणि मान्यता दिली जाईल असे यामध्ये व्यक्तत्व केले गेले. राष्ट्रीय महत्त्व असलेल्या UGC, NCERT, AICTE, ICAR इत्यादी संस्थांना राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थेला आकार देण्यासाठी आणि राष्ट्राच्या उद्योग मागण्यांना तोंड देण्यासाठी सक्षम बनवण्यात येईल असे यामध्ये जाहीर केले गेले.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे काही नवे पैलू होते. ते म्हणजे खडू-फडा मोहीम ,क्रीडा साहित्य आणि खेळणी सर्व ऋतूंसाठी असलेल्या वर्ग खोल्या, प्राथमिक विज्ञान संच पेटी, राष्ट्रीय अभ्यासक्रम, नवोदय विद्यालय यांचा समावेश यामध्ये केला गेला होता.

१९६८ च्या धोरणाच्या तुलनेत १९८६ च्या धोरणाने चांगली कामगिरी केली. यांची काही कारणे होती. सर्वप्रथम हे धोरण १९७६ मध्ये ४२ व्या घटना दुरुस्ती नंतर आले. या दुरुस्तीमध्ये शिक्षण वनी वजन आणि मापे वन्य प्राणी आणि पक्षांचे संरक्षण आणि न्याय प्रशासन यांच्यासह पाच विषय राज्यातून समावर्ती यादीमध्ये हस्तांतरित करण्यात आले होते. दुसरे म्हणजे केंद्र व्यापक जबाबदारी स्वीकारण्यासह सक्षम झाले होते आणि या धोरणाच्या अनुषंगाने अनेक कार्यक्रम सुरू केले गेले. सर्व शिक्षा अभियान मध्यांग भोजन योजना, नवोदय विद्यालय,केंद्रीय विद्यालय सुरू केल्या गेल्या.एकंदरीत शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने या धोरणाचे महत्त्व खूप जास्त होते.

## सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२

१९८६ ज्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात पी. व्ही. नरसिंहराव सरकारने १९९२ मध्ये बदल केले. नवीन विशेष शाळा उघडण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यवसायिक प्रशिक्षण देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी या क्षेत्रात पुढे येण्यासाठी तरतुदी केल्या गेल्या. नवोदय विद्यालयामध्ये गुणवत्ता वाढीवर भर देऊन इतर सर्व शाळांसाठी एक आदर्श प्रस्थापित करण्याचा प्रयत्न यामध्ये केला गेला. प्रत्येक राज्यात किमान एक मुक्त विद्यापीठ उघडण्याची तरतूद यामध्ये करण्यात आली होती आणि त्यांचे नियमन करण्यासाठी इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी ला तांत्रिक सहाय्य आणि दुरुस्त शिक्षण परिषद द्यावी लागली. या सुधारणांमध्ये एक आणखी गोष्ट झाली. देशातील सर्व व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशनासाठी अखिल भारतीय सामायिक प्रवेश परीक्षांचा आधार यामध्ये घेण्यात आला होता. खेळ आणि इतर शारीरिक हालचालींवर भर यामध्ये देण्यात आला होता विद्यार्थ्यांना एन.सी.सी. आणि एन.एस.एस. मध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी यामध्ये सूचना देण्यात आल्या होत्या. या सुधारणामुळे राष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये सकारात्मक बदल घडून आले .हे आपल्याला दिसून येते.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला मंजुरी दिली आहे .भारतीय शिक्षण व्यवस्थेत शालेय शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत अनेक बदल केले गेले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे उद्दिष्ट भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय करण्यासही मंत्रिमंडळाने यामध्ये मंजुरी दिली.

## नवीन शैक्षणिक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहे -

२०३० पर्यंत शालेय शिक्षणात १०० टक्के सकल नोंदणी गुरुत्वासह पूर्व स्कूल ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे हा यामागचा प्रमुख उद्देश्य  या धोरणामध्ये मांडला गेला आहे. सध्याची १०+२+३ प्रणाली अनुक्रमे ३-८, ८-११, ११-१४ आणि १४-१८ वर्षे वयोगटातील नवीन ५+३+३+४ अभ्यासक्रम संरचनेद्वारे बदलली जाईल. ३-६ वर्षे वयोगट जागतिक स्तरावर मुलांच्या मानसिक क्षमतांच्या

विकासासाठी महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखला जातो. या वयात आतापर्यंत नसलेल्या महत्त्वाचा भाग यामध्ये समाविष्ट होईल. तीन वर्षाच्या अंगणवाडी पूर्व शालेय शिक्षणासह १२ वर्षाचे शालेय शिक्षण देखील यामध्ये आहे.

१० वी आणि १२ वी बोर्डाच्या परीक्षा सोप्या करून सर्व विद्यार्थ्यांना दोनदा परीक्षा देण्याची परवानगी दिली जावी अशी यामध्ये शिफारस करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवलेल्या तथ्यांऐवजी त्यांचा मुख्य कौशल्यांची चाचणी घेण्याची योजना यामध्ये केली गेली. नवीन मान्यता फ्रेमवर्क आणि सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही शाळांचे नियमन करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणासह शाळा प्रशासनात बदल केले जाणार आहेत. पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रावर भर देण्याचे नियोजन यामध्ये केले गेले आहे. शाळांमधील शैक्षणिक प्रवाहात अभ्यासक्रमेतर व्यावसायिक प्रवाह यांच्यात कोणतेही कठोर वर्गीकरण असणार नाही. असे यामध्ये स्पष्टपणे नमूद केले गेले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. इयत्ता ६ वि पासून इंटर्नशिपसह शिक्षण सुरू होणार आहे. किमान इयत्ता ५ वि पर्यंत मातृभाषा, प्रादेशिक भाषेत शिक्षण होईल असे यामध्ये स्पष्टपणे नमूद केले गेले . कोणत्याही विद्यार्थ्यांवर कोणतीही भाषा लादली जाणार नाही .याकडे प्रमुख लक्ष दिले आहे. ३६० डिग्री होलेस्टिक प्रोग्रेस कार्डसह मूल्यांकन सुधारणा शिकण्याचे परिमाण प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा यामध्ये घेतला जाईल. नॅशनल कौन्सिल ऑफ टीचर एज्युकेशन द्वारे नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग सोबत सल्लामसलत करून शिक्षक -शिक्षणासाठी एक नवीन आणि व्यापक राष्ट्रीय अभ्यासक्रम फ्रेम वर्क (NCFTE )तयार करण्यात आला आहे.

या धोरणात पदवी संदर्भात काही बदल सुचविण्यात आले आहेत. अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता ४ वर्षाची, एकात्मिक बी. एड. पदवी असेल. हे २०३० पर्यंत ५० पर्यंत वाढवली जाईल. तसेच उच्च शिक्षणात ५ कोटी जागा जोडल्या जाणार आहेत .लवचिक अभ्यासक्रमासह हॉलिस्टिक अंडर ग्रॅज्युएट शिक्षण ३ किंवा ४ वर्षाचे असू शकते आणि या कालावधीत एकापेक्षा जास्त एक्झिट पर्याय आणि योग्य प्रामाणिकरण मिळणार असल्याचे यामध्ये स्पष्ट नमूद केले गेले आहे. एम. फिल. अभ्यासक्रम पूर्णपणे बंद केले जातील. पदवी - पदवीत्तर आणि पीएच.डी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमात आंतरविद्याशाखीय असतील.

बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठाच्या बरोबरीने देशातील जागतिक दर्जाच्या सर्वोत्कृष्ट बहुविद्याशाखीय शिक्षणाचे मॉडेल म्हणून स्थापित केले जातील. नॅशनल रिसर्च फाउंडेशन ही उच्च शिक्षणामध्ये मजबूत संशोधन संस्कृती वाढविण्यासाठी आणि संशोधनक्षमता निर्माण करण्यासाठी सर्वोच्च संस्था म्हणून तयार केली जाईल. भारतीय उच्च शिक्षण आयोग वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता संपूर्ण शिक्षणासाठी एकच छत्र म्हणून स्थापन केले जाईल तसेच भारतीय उच्च शिक्षण आयोगकडे खालील चार स्वतंत्र परिषदा असतील -

1. राष्ट्रीय उच्च शिक्षण यामध्ये परिषद (नियमनासाठी)
2. सामान्य शिक्षण परिषद (मानक सेटिंग साठी)
3. उच्चशिक्षण अनुदान परिषद (निधीसाठी)
4. राष्ट्रीय मान्यता परिषद (मान्यता प्राप्त करण्यासाठी)

सर्व महाविद्यालयांची सवलग्नता १५ वर्षात टप्प्याटप्प्याने बंद केली जाणार आहे आणि महाविद्यालयांना दर्जाबद्दल स्वायत्तता देण्यासाठी टप्प्यानुसार यंत्रणा स्थापन केली जाणार आहे. कालांतराने प्रत्येक महाविद्यालय एकतर स्वायत्त पदवी अनुदान महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे.

**या शैक्षणिक धोरणात आणखी काही बदल सुचविलेले आहेत.**

एक स्वायत्त संस्था नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम निर्माण केली जाईल. शिक्षण मूल्यमापन नियोजन प्रशासन वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरावर विचारांची मुक्त देवाण-घेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करण्यासाठी तयार केले जाईल विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र PARKH ची निर्मिती करण्यात येईल. यामुळे

परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस उभारण्याच्या मार्गही मोकळा झाला आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पाली,

पार्शियन आणि प्राकृत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सलेशन आणि इंटरप्रेटेशनची स्थापना यामध्ये करण्यात येईल तसेच शिक्षण क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढविण्याची ही यामध्ये योजना केली गेली आहे.

**समारोप**

२०१५ मध्ये श्रीमती स्मृती इराणी मनुष्यबळ विकास मंत्री होत्या. त्यांनी नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टिकोनातून ऑक्टोंबर २०१६ मध्ये नवे शैक्षणिक धोरण मांडले. यावर जनतेकडून सुधारणा मागवण्यात आल्या. मात्र हे धोरण मंजूर होऊ शकले नाही. हा धोरण निर्मितीचे प्रमुख टी. एस. आर. सुब्रमण्यम हे होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० साठी पुन्हा दुसरा प्रयत्न इसरोचे माझे अध्यक्ष के. कस्तुरी रंगन यांच्या अध्यक्षतेखाली समिती बनवून करण्यात आला. त्यात बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या. नवीन शिक्षण प्रणालीच्या आधारे भारत जागतिक महासत्ता होऊ शकेल असे अनेक शिक्षण तज्ञांकडून व्यक्त केले जात आहे. गांधीजींची मुल उद्योगी शिक्षा म्हणजे नवीत तालीम प्रणाली किंवा कोठारी आयोगाच्या तरतुदी या देशाला प्रगतीकडे घेऊन जायला अतिशय सक्षम होत्या पण कागदावरून प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत अनेक अडचणी आपल्याला दिसून येतात म्हणूनच शिक्षण क्षेत्रातील विविध योजनांचे फायदे आपल्याला मिळाले नाही. २०२० च्या या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी २०२२ पासून होणार असल्याचे आपल्याला निश्चित झाले आहेत. येणारा काळच ठरवेल की यात केलेल्या सुधारणा या देशासाठी किती लाभदायक आणि प्रगतीपथावर नेणाऱ्या ठरतील हे आपल्याला स्पष्ट दिसून येतील.

**संदर्भसूची: -**


1. National Education Policy 2020: Policy Reforms and Perspectives (Hardcover-2024) Dr. Ajit Mondal, Dr. Indrajeet Dutta and Dr. Bhanu Pratap Pritam
2. National Education Policy 2020 (English, Paperback, Mandal Keshab Chandra) Notion Press, Inc.
3. New Education Policy on Higher Education, Prabhat Prakashan, Manoj K. Saxena , Anu G. S.
4. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf
5. Mandavkar Pavan, 'The Role of Languages in National Education System of India', Paper Presentation, Seventeenth International Conference on Language, Literature and Culture, Abu Dhabi, UAE, 11 and 12 Aug. 2022
6. https://en.wikipedia.org/wiki/National_Education_Policy_2020
7. RashtriyaShaikshanikDhoranbyDr.Pavan Mandavkar
8. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf
9. https://www.education.gov.in/nep/about-nep

https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1988845